**प्रेसनोट दि. ३०.०१.२०२३**

लोकसेवक श्री.अनंता विठ्ठलराव भानुसे, वय ५१ वर्ष, व्यवसाय – अव्वल कारकून, कुळवहीवाट शाखा, उपजिल्हाधिकारी महसुल, जिल्हाधिकारी कार्यालय सांगली. रा. क्रांती नगर, विजयनगर, सांगली, ता मिरज जि. सांगली यांना १,५०,०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले व लोकसेवक श्री दिलीप निवृत्ती देसाई, लिपीक कम डाटा इंट्री ऑपरेटर, रोजगार हमी योजना सांगली, रा. ढवळी, ता. तासगांव, जि. सांगली यांनी तक्रारदार यांना लाच रक्कम लोकसेवक भानुसे यांना देण्यास प्रोत्साहन दिलेने लोकसेवक देसाई व लोकसेवक भानुसे यांना ताब्यात घेतले. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सांगलीची कारवाई.

---

तक्रारदार खरेदी करणार असलेल्या जमीनीचे मालक यांनी त्यांची महारवतनाची जमीन विक्री करण्याची परवानगी मिळणे बाबत जिल्हाधिकारी कार्यालय सांगली यांना दिलेला अर्ज वरीष्ठांना सांगुन मंजुर करुन देण्यासाठी स्वतःकरीता व वरीष्ठांचेकरीता २,००,०००/- रुपये लाचेची मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.१९.०१.२०२३ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली पथकास दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक १९.०१.२०२३ रोजी, दि.२०.०१.२०२३ रोजी, दि.२५.०१.२०२३ रोजी व दि.३०.०१.२०२३ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये लोकसेवक श्री.अनंता विठ्ठलराव भानुसे अव्वल कारकून यांनी तक्रारदार हे खरेदी करणार असलेल्या शेतजमीनीचे मालक यांनी महार वतनाची जमीन विक्री करण्याची परवानगी मिळणेकरीता दिलेला अर्ज वरीष्ठांना सांगुन मंजुर करण्यासाठी २,००,०००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती १,५०,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे पडताळणीत निष्पन्न झाले. तसेच लोकसेवक श्री. दिलीप निवृत्ती देसाई यांनी तक्रारदार यांना लोकसेवक भानुसे यांना लाच रक्कम देण्यास प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दि.३०.०१.२०२३ रोजी लोकसेवक श्री. भानुसे, अव्वल कारकूनयांचे विरूध्द जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथील अल्पोउपहार गृहाच्या आवारात सापळा लावला असता, लोकसेवक श्री.अनंता विठ्ठलराव भानुसे, वय ५१ वर्ष, व्यवसाय – अव्वल कारकून, कुळवहीवाट, उपजिल्हाधिकारी महसुल, जिल्हाधिकारी कार्यालय सांगली. रा. क्रांती नगर, विजयनगर, सांगली, ता मिरज जि. सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून १,५०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. तसेच लोकसेवक श्री दिलीप निवृत्ती देसाई यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने श्री.अनंता विठ्ठलराव भानुसे, व लोकसेवक श्री दिलीप निवृत्ती देसाई यांचे विरुध्द विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अमोल तांबे, पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, व श्री सुरज गुरव, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली, श्री दत्तात्रय पुजारी, पोलीस निरीक्षक, श्री. विनायक भिलारे, पोलीस निरीक्षक, तसेच पोलीस अंमलदार धनंजय खाडे, अजित पाटील, प्रितम चौगुले, सीमा माने, सलीम मकानदार, रविंद्र धुमाळ, ऋषीकेश बडणीकर, अतुल मोरे, सुदर्शन पाटील, चंद्रकांत जाधव, राधीका माने, चालक अनिस वंटमुरे यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ९६७३५०६५५५ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

(विनायक भिलारे)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,सांगली

पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सत्यमेव जयते

Scanned with OKEN Scanner